**महाराष्ट्र शासन**

**टंचाई प्राथम्य**

**क्र. टंचाई -१००३/प्र.क्र. १८६/पापु-१४**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- १९ मे २००३**

**प्रति,**
**१. जिल्हाधिकारी (सर्व)**
**२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)**
**३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)**

**विषय :- पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या गावात टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करण्यासाठी लेखाशीर्ष २२४५ अंतर्गत अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत, लेखार्शीर्ष "२२४५-नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य " या लेखाशिर्षाखाली वेळेवर निधी उपलब्ध न झाल्यास, टँकर /बैलगाडीसाठी डिझेल व वंगणावरील खर्च भागविणे शक्य होत नाही. परिणामी, पाणी टंचाई असताना टँकर बंद ठेवावे लागतात, अशा बाबी पुन्हा पुन्हा निदर्शनास येत आहेत.

याबाबत यापूर्वी शा.प्र. क्र. एमआयएम-१००२ /प्र.क्र.३३९/पापु-१४ दि. १६/१०/२००२ अन्वये आपले लक्ष वित्त विभाग शुध्दिपत्रक क्र. मकोनि /१०९७/प्रक्र. १६०/९७/ रोशा-४, दि. ६ ऑक्टोबर, २००० कडे वेधण्यात आले आहे. (सुलभ संदर्भासाठी प्रत पुन्हा सोबत जोडली आहे.) सदर शुध्दीपत्रकानुसार लेखाशीर्ष २२४५ -नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य या लेखाशीर्षाखालील देयकांची प्रदाने, तरतूद उपलब्ध नसल्याच्या परिस्थितीत कार्यालय प्रमुखांनी अनुदान प्राप्त करुन घेण्याबाबत लेखी हमी दिल्यास व मागणी अन्यथा योग्य असल्यास, कोषागार अधिका-याने प्रदाने नाकारु नयेत, अशी तरतूद आहे.

वरीलप्रमाणे तरतूद लक्षात घेऊन सद्याच्या पाणी टंचाई काळावधीत कोठेही अनुदाना अभावी टँकर बंद पडणार नाही, याबाबत आपण सर्वांनी दक्षता घेऊन, लेखाशिर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य या लेखाशीर्षाखाली ज्या ज्या वेळी अनुदान उपलब्ध नसेल परंतू पाणी टंचाई निवारणार्थ टँकर /बैलगाडी चालू ठेवणे अपरिहार्य असेल अशा वेळी या विभागाकडे अनुदानाची मागणी करावी. व तरतूद उपलब्ध होईपर्यंत, उपरोक्त आदेशानुसार, कोषागारातून अनुदान मंजूर करुन घ्यावे आणि टँकर / बैलगाडीच्या डिझेल /वंगणाची बीले भागविण्यात यावीत , अशी आपणांस विनंती आहे.



५३३

प्रस्तुत आदेशाबाबत कोणताही काही संदेह असेल तर त्याबाबत संबंधितांनी आताच निरसन करुन घ्यावे, परंतु ऐनवेळी उपरोक्त तरतुदीनुसार कार्यवाही न करता विनाकारण टँकर /बैलगाडीच्या डिझेल/वंगणाची बीले वेळच्या वेळी भागविली गेली नाहीत, तर याबाबत संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल, याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.

सहपत्र - वरीलप्रमाणे

**(बी. सी. खटुआ)**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रतः- माहितीसाठी
विभागीय आयुक्त, सर्व
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
महसूल व वन विभाग , मंत्रालय, मुंबई
पापु-१४ संग्रहासाठी.



438